सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता उर्वरित व्यवस्थापकीय अनुदान, ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) मंजूर करण्याबाबत.
वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्यादित)

महाराष्ट्र शासन
विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग,
शासन निर्णय क्रमांक-वनांम-२०१८/प्र.क्र. ०२-अ/महामंडळे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ३१.३.२०१८

संदर्भ :- १. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.०४.२०१७
२. शासन ज्ञापन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक-बीजीटी-२०१७/ प्र.क्र.७१/अर्थसंकल्प, दि. १६.०५.२०१७
३. शासन पत्र, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक-बीजीटी-२०१७/ प्र.क्र.७१/ अर्थसंकल्प, दि. ०६.०६.२०१७
४. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र. ९४/अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७
५. शासन निर्णय क्रमांक- वनाम-२०१७/प्र.क्र.७७/महामंडळे, दि. २८.१२.२०१७

शासन निर्णय :-

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या) मुंबई मार्फत विमुक्त जाती , भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या दारिद्रयरेषेखालील व्यक्तींची आर्थिक उन्नती करण्यासाठी विविध योजना राबविण्यात येतात. या महामंडळास सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता व्यवस्थापन व प्रशासनावरील खर्च भागविण्याकरीता, ३१- सहायक अनुदाने (वेतनेतर) यासाठी रु. १४,५०,०००/- इतकी तरतुद अर्थसंकल्पीय करण्यात आली असुन, सुधारीत अंदाजामध्ये रु.१३,०५,०००/- इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार मंजूर अनुदानाच्या ७० टक्के रक्कम रु. १०,१५,०००/- इतके व्यवस्थापकीय अनुदान शासन निर्णय दि.२८.१२.२०१७ अन्वये महामंडळास वितरीत करण्यात आले आहे. व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (म) यांनी सदर अनुदान महामंडळाने त्याच प्रयोजनार्थ खर्च केले असल्याचे कळविले असुन त्याबाबतच्या उपयोगिता प्रमाणपत्राची प्रत सादर केली आहे व वेतनेतर अनुदानाची शिल्लक असलेली ३० टक्के रक्कम रु. २,९०,०००/- महामंडळास वितरीत करण्याची विनंती केली आहे.

०२. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळास सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाकरीता वेतन अनुदानाची शिल्लक असलेली ३० टक्के रक्कम रु. २,९०,०००/-(अक्षरी रुपये दोन लाख नव्वद हजार फक्त), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) याखाली वितरीत करण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.-

१. योजनेतर निधीतील खर्चासाठी शासनाने ठरविलेले निर्बंध काटेकोरपणे अंमलात आणावेत.
२. व्यवस्थापनावरील खर्च मर्यादित ठेवण्याच्या दृष्टीने कामकाजात सुसूत्रता आणावी.

३. विविध बाबींवर खर्च केलेल्या रकमांची तपशीलवार माहिती व त्यावर केलेला खर्च याची सविस्तर माहिती शासनास सादर करावी.
४. कार्यालयीन खर्चात काटकसर करावी.
५. महामंडळाने कर्जाच्या वसुलीचे प्रमाण प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्न करावेत.
६. सदर योजनेचा निधी उपयोगिता प्रमाणपत्रे तपासण्याच्या अधीन वितरीत करण्यात येत आहे.

०३. उपरोक्त निधीचा खर्च करतांना संबंधित अधिकाऱ्यांनी सर्वसाधारण वित्तीय नियम, योजनेच्या अटी व शर्ती, CVC मार्गदर्शक सूचना, CAG निरीक्षणे इ. अनुपालन करून निधीचा विनियोग करावा.

०४. सदर महामंडळ, संदर्भ क्र. १ येथील वित्त विभागाच्या शासन परिपत्रकातील तसेच त्यासोबतच्या तपासणी सूचीमध्ये नमुद केल्यानुसार संबंधित अटींची पुर्तता करीत असल्याचे अधिन सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

०५. वरील अनुदानाबाबत संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, पुणे हे नियंत्रक अधिकारी राहतील. सदर अनुदानाची रक्कम पुढील कार्यवाही करीता प्रादेशिक उपायुक्त, मुंबई समाजकल्याण, नवी मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे. त्यांना सदर अनुदान म.को.नि.४४ मधील नमुन्यातील देयकान्वये वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या.), मुंबई यांस संवितरीत करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

०६. याबाबीवर खर्च मागणी क्र. एन-३,२२२५- अनसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०३, मागासवर्गाचे कल्याण, ८००, इतर खर्च, (०३) विमुक्त जाती, भटक्या जमाती विकास महामंडळांना अनुदाने, (०३) (०१) वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळ (अनिवार्य) (२२२५ २३८२), ३१ सहायक अनुदाने, (वेतनेतर) या लेखाशिर्षाखली खर्ची टाकून सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतूदीतून भागवावा.

०७. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या परिपत्रक क्र. अर्थस-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८.०४.२०१७ व वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ३०.६.२०१७ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारीतेत निर्गमित करण्यात येत आहे.

०८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४०५१६५९३०९८२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2018.04.05 17:00:55 +05'30'

(भा. र. गावित)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे
२. सह सचिव (महामंडळे) , विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग,, मंत्रालय, मुंबई
३. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, कोकण भवन, नवी मुंबई (दोन प्रती)

४. व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (म), मुंबई
५. महालेखापाल (ले व अ) महाराष्ट्र -१ व २, मुंबई/नागपूर
६. महालेखापाल (ले.प.) महाराष्ट्र -१ व २, मुंबई/नागपूर
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / जिल्हा कोषागार अधिकारी मुंबई /ठाणे
८. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
९. अप्पर कोषागार अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई
१०. वित्त विभाग (का- व्यय-१४/अर्थोपाय/अर्थसंकल्प-३/साउ) मंत्रालय, मुंबई
११.सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई
१२. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प) विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. निवडनस्ती (महामंडळे) विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग,मंत्रालय, मुंबई